प्रेसनोटदिनांक ०८/०७/२०१९
स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे

**श्री. श्रीकांत तरवडे, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांनी ३० मोबाईल नागरिकांना केले परत**

अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे श्री. श्रीकांत तरवडे यांनी दिनांक १६/०६/२०१९ रोजी पदभार स्विकारला. त्यांचे मार्गदर्शानाखाली स्वारगेट पोलीस स्टेशन येथे परिमंडळ-०२ चे पोलीस उप आयुक्त श्री. बच्चन सिंह, स्वारगेट विभागाचे सहा. पोलीस आयुक्त श्रीमती डॉ. प्रिती टिपरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अशोक कदम व पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री. शब्बीर सय्यद यांच्या मार्गदर्शन घेवुन पोलीस उप निरीक्षक श्री. समाधान कदम, पोलीस नाईक मंगेश बोराडे, पोलीस कॉन्सटेबल सचिन दळवी, शैलेश वाबळे यांनी चालु स्थितील ३० मोबाईल तांत्रिक तपास करुन शोध घेवुन नागरिकांना परत केले आहेत.

सदर प्रसंगी विनायक शिंत्रे म्हणाले, “माझा ॲपल आय फोन ८ हा फोन हफ्त्यावर घेतला होता व हरवल्यानंतर देखिल त्याचे हफ्ते मला भरावे लागत होते. त्यामुळे मी खुप त्रासलो होतो. परंतु आज मला पोलीसांकडुन मोबाईल परत मिळाल्याने मी खुप आनंदी झालो व मी पोलीसांचे खुप खुप आभार मानतो”.

तसेच गिता शिंदे म्हणाले, “मी सणस मैदान येथे भाला फेकच्या राष्ट्रीय खेळाडु असुन माझा सदर ठिकाणीहुन मोबाईल गहाळ झाला होतो. माझा मोबाईल गेल्यानंतर मी स्वारगेट पोलीस स्टेशन येथे ऑनलाईन तक्रार दिली. तसेच माझा पुणे पोलीसांचे आभार मानते”.

अभिजित बारकडे म्हणाले, “मी सध्या एम.पी.एस.सी. मार्फत पी.एस.आय. या पदाचा अभ्यास करतो.त्यामुळे मला माझा फोन पोलीसांनी परत केल्याने मी खुप आनंद होत आहे. कारण मी देखिल पोलीस खात्यामध्ये जाण्यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यामुळे मला पोलीस खात्याचा अभिमान वाटतो”.

सदर कार्यक्रमामध्ये श्री. श्रीकांत तरवडे, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांनी सर्व नागरिकांना मार्गदर्शन करुन त्यांना वाटलेला पोलीसांवरील विश्वास हे आमच्या कामाची पावती आहे, असे प्रतिपादन केले.

सदर कार्यक्रमा करीता श्री. श्रीकांत तरवडे, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांचेसह ३० नागरिक व पत्रकार बंधु उपस्थित होते.



